## अमरावती महानगरपालिका, अमरावती

**दिनांक १४/०१/२०२५ रोजी प्राप्त तसेच**

**दिनांक ०३/०२/२०२५ रोजी मंजुर सर्वसाधारण सभा ठरावाची प्रत**

**(प्रशासकीय विषय)**

विषय क्रमांक २०५ - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२३-२४ अंतर्गत १ कामाचा नावामध्ये बदल असल्याचे सर्वसाधरण सभेची मंजुरी प्रदान करणेबाबत.

ठराव क्रमांक २०५ - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात अमरावती महानगरपालिकेस विकास शिर्ष अंतर्गत रु. १०.०० कोटी महानगरपालिकेस प्राप्त आहे.

सन २०२३-२४ अंतर्गत ठराव क्रमांक १७० अन्वये ८१ कामे रु. ११.९५ कोटीचे कामे प्रस्तावित करण्यात आले होते. त्यामधील सहाय्यक आयुक्त समाजकल्याण विभागानी ६४ कामे रू. १०,०४ कोटीची पाहणी करून मंजुरी देण्यात आलेली होती. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांची प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली होती. सदर ६४ कामांची कार्यारंभ आदेश होऊन, कामे प्रगती पथावर आहेत. त्यामधील उर्वरीत १ काम खालील प्रमाणे

| अ.क्र. | यापुर्वी केलेले प्रस्तावित कामाचे नाव | दुरुस्ती करण्यात आलेले कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १. | प्र.क्र.२२ नवि वस्ती बडनेरा येथील मिलचाळ परिसरातील (मोदी हॉस्पीटल) समाज मंदिरा मधील (पंचशील) कंपाऊंड वॉल व संडास बाथरुमचे काम करणे. | प्र.क्र.२२ नवि वस्ती बडनेरा येथील मिलचाळ परिसरतील (मोदी हॉस्पीटल) अभ्यासिका मधील (पंचशील) कंपाऊंड वॉल व संडास बाथरुमचे काम करणे. | १४,९७,७०१/- |

यापूर्वी केलेले प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता-२ यांचेकडुन तांत्रिक मंजुरी घेवून ससंनर विभाग यांचेकडून नकाशे मंजुर करुन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे प्रमाणित करण्याकरिता परिपुर्ण पाठविण्यात आलेले होते. परंतु सदर काम समाज कल्याण विभागातील

कर्मचारी यांनी स्थळ पाहणी करतेवेळी प्रस्तावित जागेमध्ये समाज मंदिराच्या ऐवजी अभ्यासिका बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.त्या अनुषंगाने संबंधित अभियंता यांनी अंदाजपत्रक नव्याने तयार करण्यात आलेले आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

स्वा./-
नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती

स्वा./-
प्रशासक
महानगरपालिका,अमरावती

नगर सचिव
अमरावती महानगरपालिका